Vol 3 Issue 9 Oct 2013

Impact Factor : 0.2105(GISI)

ISSN No : 2230-7850

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-9, Oct-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# अध्ययन, अध्यापन पध्दतीत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग

**सुहास रं. मोराळे , दिलीप पवार**

संशोधन मार्गदर्शक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड
प्राचार्य तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख भगवान महाविद्याय, आष्टी ता. आष्टी जि. बीड (महाराष्ट्र)

***सारांश :***भारताच्या प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतच्या शिक्षण पध्दतीची धोरणे व अध्यापन पध्दतीमध्ये साधारणता दोन शतकांपासून गेल्या काही दशकांपर्यंत तोच तो साचे बंदपणा, पारंपारिकता, आढळून आलेली आहे. साधारणपणे 1835 ते 1985 सर 150 वर्षाच्या काळामध्ये भारताचे शैक्षणिक धोरण व पध्दती मेकॉले प्रणीत राहिली. मेकॉलेचे हे शैक्षणिक धोरण व शिक्षण पध्दत पुर्णतः चुकीचे व भारतांसाठी गैर लागू आहे. असे कळलेले असतांनाही आमच्या राज्यकर्त्यांनी, सत्ताधा–यांनी मेकॉलेचेच शैक्षणिक धोरण व शिक्षण पध्दत तशीच पुढे ठेऊन प्रचंड मोठी चुक केलेली आहे. दुसरीकडे 1985 ते आजतागायत भारतातील केंद्र व बहुतांशी घटक राज्य सरकारांनी अनेक आयोग, समित्या, कमिशन नेमुन शैक्षणिक धोरण व शिक्षण पध्दतीला मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यामुळे याचे आज अत्यल्पच चांगले परिणाम दिसुन येतात तर अनेक अनेक दुष्परिणाम स्पष्टपणे आज आपल्या सभोवताली दिसत आहेत.

### *प्रस्तावना :*

यामध्ये खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने तर अधिकच भर घतलेली आहे. एक दिवसाच्या शतकात व शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आपल्याला टिकायचे असेल तर पहिल्यांदा आपल्याला शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता सिध्द करावी लागेल. यासाठी शैक्षणिक धोरणांमध्ये नाविन्यपूर्ण बदल करुन अध्यापन पध्दतीतही नाविन्यपुर्ण तंत्र, कौशल्यांचा स्विकार सर्वच विद्याशाखांमध्ये करावा लागणार आहे. यामध्ये शिक्षकांच्या बरोबरच विद्यार्थ्यांच्या सहभागाचीही अत्यंत महत्वाची भुमिका असणार आहे.कारण सद्यस्थितीत भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात धोक्याची घंटा वाजत आहे. अपु–या शैक्षणिक सुविधा, फीस मधील भरमसाठ वाढ, नोकरीचे व रोजगाराचे कुठलीही हमी नसणे, बेरोजगारीतली प्रचंड वाढ, महागाई, न्युनगंड, गैरसमज, आदी कारणांमुळे विद्यार्थी, पालक व समाज उच्च शिक्षणाकडे नकारात्मक दृष्टीने पाहत असुन उच्च शिक्षणापासून कोसो दूर राहुन अलिप्त राहू पाहत आहे व जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. यातील विशेष करून कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षण व विधी विद्याशाखांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची सातत्याने वर्गातील व महाविद्यालयातील उपस्थिती अत्यंत नगण्य असुन चिंतेचा विषय ठरली आहे. नाविण्यपुर्ण अध्यापन पध्दतीमुळे उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचा सहभाग निश्चितपणे मोठया प्रमाणात वाढेल व यातून कुशल मनुष्यबळ निर्माण होऊन शाश्वत, चिरंतन व सर्वांगिण विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान होईल.

### *उद्देश :–*

प्रस्तुत संशोधन लेखाचे उद्दिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

1.उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीचा अभ्यास करून ती रोकण्यासाठीचे उपाय शोधने.
2.नाविण्यपुर्ण अध्यापन पध्दती, तंत्र व साधनांकडे शिक्षक व विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेणे.
3.उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्ण अध्यापन पध्दतीत शिक्षकांच्या बरोबरच विद्यार्थ्यांचा सहभाग व सकारात्मक भुमिका वृध्दींगत करणे.
4.पारंपारिक व नाविन्यपूर्ण अध्यापन पध्दतीची चर्चा होणे.
5.शिक्षण क्षेत्रातल्या सद्यस्थितींकडे अभ्यासकांचे, शिक्षक, विद्यार्थी व शिक्षण प्रेमींचे लक्ष वेधून घेणे.

### *तथ्य संकलन :–*

प्रस्तुत संशोधनात लेखासाठी द्वितीयक साधनाचा उपयोग केलेला आहे. यासाठी संशोधनात्मक लेख, पुस्तक, संदर्भ ग्रंथ, रिचर्स जर्नल्स, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, वृत्तपत्रे आदींचा स्त्रोत म्हणुन आधार घेतला आहे.

### *उच्च शिक्षणातील संख्यात्मकता, गुणात्मकता :–*

देशभरामध्ये आजपर्यंत उच्च शिक्षणातील संख्यात्मक व गुणात्मकतेबाबत वेगवेगळया सर्वेक्षणाद्वारे पाहण्याद्वारे विविध निष्कर्ष मांडलेले आहेत. या विविध पाहण्यांनी यापुर्वी काढलेल्या निष्कर्षावर 'Aspiring Minds' या संस्थेने स्वतःच्या ताज्या पाहणीद्वारे शिक्का मोर्तब केले आहे की नौकरी (Job) मिळविण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये 47: पदवीधरांकडे अजिबातच नसतात व यातील 90: पदवीधरांकडे तर इंग्रजीतून संवाद साधण्याचे कौशल्ये नसते. या पाहणीने या धक्कादायक आकडेवारी बरोबरच इतरही आकडेवारी प्रसिध्द करून उच्च शिक्षणातील संख्यात्मकता, गुणात्मकतेची चिरफाड केली आहे.

उच्च शिक्षणातील अध्यापन पध्दतीत अमुलाग्र नाविन्यपुर्ण बदलासाठी गुणवत्तेसाठी एकुणच उच्च शिक्षणाचा सर्वांगीण विकासासाठी योग्य ती पुरक पावले उचलली जाताना दिसत नाही. एकीकडे उच्च शिक्षणाचा परीघ विस्तारतो आहे, महाविद्यालये, विद्यापीठ, अभ्यासक्रम व विद्यार्थी संख्या प्रचंड झपाटयाने वाढते आहे तर त्या तुलनेत गुणवततेची वाढ होताना दिसुन येत नाही. या पाहणीने 1.21 अब्ज लोकसंख्या असणा–या भारतातील 18 ते 25 वयोगटातील तरुणांपैकी फक्त 13: तरुणच उच्च शिक्षण घेत आहेत. यांची संख्या वाढली तरच उच्च शिक्षणातील नोंदणीचे प्रमाण (Gross Anroolment Ratio- GANR) वाढणार आहे. भारत सरकारने हे प्रमाण वाढविण्यासाठी जाणीवपुर्वक खासगीकरणाचा मार्ग स्विकारला आहे. परंतु हे करतांना नियमनासाठी ना योग्य यंत्रणा उभारली आहे, ना योग्य ठोस धोरण आखले आहे. पारंपारिक आणि नाविन्यपुर्ण काळानुरूप अभ्यासक्रम अध्यापन पध्दती यामध्ये योग्य तो समन्वय घडवून शिक्षणाला परिणामकारक करण्याचे सुत्रबध्द प्रयत्नही झाले नाही. भलेही काळानुरुप काही अभ्यासक्रम, विशय स्विकारले जातात. परंतु ते पारंपारिक पध्दतीनेच शिकविले जात आहेत. शिक्षकांचे प्रशिक्षण, नाविन्यपुर्ण अध्यापन, अध्यापन पध्दती व साधने आणि प्रात्यक्षिकांपासुन उद्योगांच्या सहभागापर्यंतचे सर्व टप्पे क्रमाने पार पाडले गेलेलेच नाहीत. यामुळे या सर्व प्रक्रियेमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या सहभागाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त होते. संख्यात्मकता वाढल्याने गुणात्मकता जी कमी झालेली आहे तिच्यामध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या सक्रिय सहभागाने वाढ होण्यास मदत होईल.

### *शिक्षकाची भूमिका :–*

कोणत्याही देशाचा दर्जा हा त्या देशातील शिक्षणाच्या दर्जावर व शिक्षण पध्दतीवर अवलंबून असतो व यामुळे देशाचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांचा दर्जा, गुणवत्ता उंचावणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षकाने पारंपारिक ज्ञान, अभ्यासक्रम अध्यापन पध्दती इ. बरोबरच काळानुरूप आधुनिक नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम, ज्ञान, माहिती, अध्यापन पध्दतीसुध्दा आत्मसात करून आपल्यातील गुणवत्ता सिध्द करुन तिच्यामध्ये सातत्याने वाढ करणे गरजेचे आहे. शिक्षकाच्या तयारीच्या कार्यक्रमात (प्रशिक्षणात) खालील बाबींचा समावेश असावा असे यूनेस्कोच्या 1986 च्या ठरावामध्ये शिक्षकांच्या भुमिके विषयी म्हणलेले आहे.

1.सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगती अध्यापनामार्फत पार पाडणे.
2.सामान्यज्ञान व वैयक्तिक संस्कृती ह्यांचा प्रत्येक विद्यार्थ्यांत विकास झाला

पाहिजे.
3.दुस–यांना शिकविण्याची क्षमता असावयास पाहिजे.
4.चांगले मानवी संबंध घडविण्यासाठी ज्या तत्वज्ञानाची जरुरी आहे ते तत्वज्ञान अवगत असणे.

या बरोबरच ए.एस.बांट यांच्यामते शिकक्षकांकडे ज्ञान, कौशल्य व अभिवृत्ती यांच्या संदर्भात खालील काही गुण असणे गरजेचे आहे.

1.शिकवावयाच्या विषयाचे पुरेसे ज्ञान
2.व्यावसायिक प्रत्यक्षकृती आणि पध्दती (तंत्र) यांचे समग्र ज्ञान
3.शैक्षणिक संशोधन व समस्या – उकलन यांच्यातील कौशल्य
4.मानवी विकास आणि अध्ययनप्रक्रिया यांचे संगोपांग ज्ञान
5.लिहिताना व बोलताना भाषा वापरण्याचे कौशल्य
6.विद्यार्थ्यांविषयी जिव्हाळा

प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्वच शिक्षण प्रक्रियेत शिक्षक व विद्यार्थी (शिष्य) यांचे परस्पर संबंध सलोख्यानेच असले पाहिजेत. शिक्षकाला व्यक्तिमत्व विकास, शिक्षणाचे तत्वज्ञान आणि आणि समाज, सामाजिक समस्या इ. विशयाचा दृष्टीकोन बाळगणे गरजेचे आहे.

***समारोप :–***

अध्ययन अध्यापन प्रक्रियेविषयीच्या संकल्पनेमध्ये आता काही प्रमाणात बदल होत आहे. यामुळे प्रक्रियेत आता शिक्षकांबरोबरच विद्यार्थ्यांचा सहभाग सुध्दा तिकाचा महत्वाचा मानला जात आहे. विद्यार्थ्यांला केवळ अभ्यासक्रम शिकवणे, माहिती पुरविणे एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांनी स्वतः प्रयत्न करुन अभ्यासक्रम व्यतिरिक्त माहिती तंत्रज्ञान, विज्ञान, सामान्य ज्ञान, वैज्ञानिक दृष्टीकोन जिज्ञासू वृत्ती, इ. कौशल्ये अवगत करणे, अभिवृत्ती विकसित करणे, सामाजिक जीवनाला पोशक अशी जीवनमुल्ये अंगी बाळगणे, सामाजिक बांधिलकी जोपासणे, नैतिक मुल्य जोपासणे, संविधानातील मुलभूत कर्तव्यांविषयी तत्पर असणे इ. विषयातील गुणसंपदा विद्यार्थ्यांनी अध्यापनाबरोबर मिळविणे गरजेचे आहे यासाठी शिक्षकांनी जाणीवपुर्वक प्रयत्न करावयास पाहिजेत.विद्यार्थी व पालकांचा सरकारी शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांवरील विश्वास कमी होऊन त्यांचा ओढा खाजगी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांकडे वाढला आहे. खासगी संस्था अधिक दर्जेदार असतात असा समज विद्याार्थी व पाल्यांचा झालेला आहे. मात्र वस्तुस्थिती तशी नाही. काही मोजक्या खासगी संस्थांचा अपवाद वगळल्यास बहुतेक खासगी संस्था यथातथाच असून केवळ त्यांचा डामडौल दिसुन येतो याच्याच आडुन ते विद्यार्थ्यांचे आर्थिक शोशन मोठया प्रमाणावर करतात. या सर्वच खासगी संस्था विद्यार्थ्यांकडून येणा–या शुल्कावरच चालतात. त्यामुळे इथे तडजोडी केल्या जातात. या खाजगी संस्थामधील विद्यार्थी मोठया प्रमाणावर अनुत्तीर्ण होणे संस्थेच्या व्यवसायाला प्रतिकुल ठरणारे असते. त्यामुळे गुणवत्तेची पातळी जाणीवपुर्वक कमी केली जाते असाही अनुभव समोर आलेला आहे. उच्च शिक्षणामध्ये तर 80: विद्यार्थी खासगी क्षेत्राद्वारे उच्च शिक्षण घेत असल्याची आकडेवारी अलिकडे प्रसिध्द झाली आहे. शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ हे तिन्ही वेगळे घटक असल्याने त्यांची परस्परात तुलना करता येत नसली, तरी खाजगी म्हणजे दर्जेदार असे थेट समीकरण मांडता येत नाही हे विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी देखील लक्षात घेतले पाहिजे.

***संदर्भ सूची :–***

1.Bhatiya Kamala & Bhatiya B.D.-The Principles and Methods of Teaching
2.Dr. Sudhir Gavane (Sept.2007)- The Golden Words Convocation Address of Dr. Babasaheb Ambedkar Marathawada, University Aurangabad.
3.म. बा. कुंडले, अध्यापनशास्त्र आणि पध्दती
4.ह. ना. जगताप, प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान
5.शिक्षण संवेदन, ऑगस्ट 2001, मार्च 2009
6.महाराष्ट्र टाईम्स, 27 जुन 2013

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net